## थोडक्यात बातम्या

### पालघरमध्ये शालेय विभागस्तरीय तायक्वाँदो स्पर्धेचे आयोजन



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०१, पालघर (रायगड) :** क्रीडा व युवक सेवा संचालनालय,महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या मार्गदर्शनानुसार जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय,पालघर आणि वसई विरार म हानगर पालिका यांच्या संयुक्त विद्यमाने सन २०२६-२७ मधील विभागस्तरीय शालेय तायक्वाँदो क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत १४, १७ व १९ वर्षांखालील मुले व मुली या वयोगटातील खेळाडू सहभागी होणार आहेत. स्पर्धेचे आयोजन दि. १ व २ ऑक्टोबर २०२६ रोजी करण्यात येणार असून, स्पर्धे चे ठिकाण सेंट गोंसालो गार्सिया कॉलेज,बस डेपो जवळ,वसई गाव,वसई पश्चिम येथे निश्चित करण्यात आले आहे. दि.१ ऑक्टोबर रोजी १४, १७ व १९ वर्षांखालील मुलांची,तर २ ऑक्टोबर रोजी १४,१७ व १९ वर्षांखालील मुलींची स्पर्धा होणार आहे.खेळाडूंची उपस्थिती सकाळी ८.०० वाजता राहणार आहे.

स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूंनी जन्मदाखला, संबंधित खेळाडूचे आधार कार्ड तसेच शाळेच्या जनरल रजिस्टरमधील नोंदीची सत्यप्रत आवश्यक कागदपत्रांसह सादर करणे बंधनकारक आहे.तसेच प्रत्येक खेळाडूने स्वतःचे आवश्यक तायक्वाँदो साहित्य आणावे आणि स्पर्धेसाठी माऊथ गार्ड अनिवार्य असल्याचे आयोजकांनी स्पष्ट केले आहे.

विभागीय स्पर्धेसाठी पात्र खेळाडूंची प्रवेशिका संबंधित विभागाकडे वेळेत पाठविण्याचे आवाहन करण्यात आले असून, खेळाडूंनी शिस्त व क्रीडाभावनेने स्पर्धे त सहभागी व्हावे,असे आवाहन सुहास व्हनमाने जिल्हा क्रीडा अधिकारी, पालघर यांच्याकडून करण्यात आले आहे.

# अखेर शासन नमले! पाडेगाव शाळांच्या मुख्याध्यापकावरील गुन्हे वनविभागाकडून मागे

**अक्षराज : स्वप्निल जावळे**

**दि.०१, पाडेगाव (सातारा) :** पाडेगाव तुकाईनगर येथे वनविभागाच्या जागेत असणाऱ्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आणि न्यू इंग्लिश स्कूल माध्यमिक विद्यालयाच्या अतिक्रमणामुळे मुख्याध्यापिका ज्योती जाधव आणि मुख्याध्यापक श्री.केंजळे यांच्यावर वन विभागाने गुन्हे दाखल करून शाळा काढून घेण्याचे आदेश दिले होते.

महाराष्ट्र शासनाच्या या अन्यायकारक कृती विरोधात वीर योद्धा प्रतिष्ठानचे अध्यक्ष अमित (बापू) ढश्रवरे, राहुल कोकरे सरपंच पाडेगाव, समस्त ग्रामस्थ पाडेगाव आणि नीरा पंचक्रोशीतील सामाजिक कार्यकर्त्यांनी गुरुवार, दि.०१ ऑक्टोबर २०२६ रोजी पाडेगाव फार्म येथे श्री संत बाळूमामा मंदिरा शेजारील कॅनॉलमध्ये जलसमाधी आंदोलनाचा इशारा देत शासनाच्या सर्व विभागांना नोटीस दिली होती. या पार्श्वभूमीवर आंदोलनाच्या दिवशी जम लेले पदाधिकारी, ग्रामस्थ, सामाजिक कार्यकर्ते, वन विभागाचे अधिकारी आणि पोलीस प्रशासन यांच्यात सम न्वय बैठक झाली. या बैठकीत वन विभागाकडून दोन्ही मुख्याध्यापकांवर वैयक्तिक गुन्हे दाखल झाल्याबद्दल दिलगिरी व्यक्त करण्यात आली.

तसेच त्यांच्यावरील वैयक्तिक गुन्हे मागे घेत असल्याबाबत आणि प्राथमि क व माध्यमिक शाळा तसेच श्री तुकाई देवी मंदिराचे वन विभागातील अतिक्रमण Forest Conservation Act १९८० अंतर्गत नियमित करण्यास मदत करणार असल्याचे लेखी आश्वासन पत्र जा.क्र.ब/संकीर्ण/२०२६.२७/५९८, दि. २०/०९/२०२६ अन्वये देण्यात आल्याने पुकारण्यात आलेले जलसम ाधी आंदोलन स्थगित करण्यात आले.

आंदोलनासाठी अमित (बापू) ढश्रवरे अध्यक्ष वीर योद्धा प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य, सूर्यकांत खरात माजी सरपंच, गिरीश बनकर जि.प.सदस्य, राहुल कोकरे सरपंच पाडेगाव, हेमंत सुतार शिवसेना तालुकाप्रमुख फलटण, माजी सरपंच दत्तात्रय खरात, विजय खरात माजी चेअरमन, माजी उपसरपंच शेखर खरात, नवनाथ मांढरे,अमरसिंह बुरुंगले, सतीश वावरे माजी पं.स. सदस्य, महादेव चोरमले तसेच नीरा पंचक्रोशीतील सामाजिक कार्यकर्ते नितीन केदारी, अकबर सय्यद, मंगेश ढमाळ, सचिन मोरे, महेश जेधे, अमोल साबळे, सोनू वाघमारे आणि टी. के. जगताप, वीर योद्धा प्रतिष्ठान पुरंदर तालुका अध्यक्ष नितीन साळुंखे, खंडाळा तालुका अध्यक्ष स्वप्नील जावळे आणि वीर योध्दा प्रतिष्ठानचे सर्व पदाधिकारी तसेच शाळेवर प्रेम असणारे ग्रामस्थ व विद्यार्थ्यांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



वन विभाग आणि पोलीस प्रशासनाकडून चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. फलटण वन विभागाकडून वन अधिकारी श्री.परधाने, श्री.पाटील, महिला वनाधिकारी तसेच लोणंद पोलीस स्टेशनचे पोलीस अधिकारी श्री. हेगडे, श्री. दडस , श्री. धुमाळ आणि पोलीस पाटील सुरज खरात उपस्थित होते.

# पितृ पंधरवड्यानिमित्त लायन्स क्लबतर्फे 'दानोत्सव'चा शुभारंभ

## गरजू आणि वंचित घटकांना मदतीचा हात देण्यासाठी उपक्रम

**अक्षराज : विठ्ठल निकाळजे**

**दि.०१, पुणे :** पितृ पंधरवड्याचे औचित्य साधून लायन्स क्लब ऑफ पुणे अशोकनगर गोल्ड (डिस्ट्रिक्ट ३२३४ डी२) च्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत 'दानोत्सव' या उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. या दानोत्सवाचे उद्घाटन डिस्ट्रिक्ट गव्हर्नर श्रेयस दीक्षित आणि फर्स्ट लेडी ऑफ द डिस्ट्रिक्ट प्रीती दीक्षित यांच्या शुभहस्ते पार पडले.



पितृ पंधरवडा हा पूर्वजांचे स्मरण करून त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा काळ मानला जातो. याच भावनेला सामाजिक सेवेची जोड देत समाजातील गरजू व वंचित घटकांना मदतीचा हात देण्याच्या उद्देशाने या उपक्रम ाचे आयोजन करण्यात आले आहे.

या उपक्रमांतर्गत नागरिकांकडून प्राप्त होणारे दान पुढील सामाजिक संस्थांना सुपूर्द करण्यात येणार आहे :-

आपुलकी वृद्धाश्रम
उमेद फाउंडेशन
गुडविल फाउंडेशन
स्नेहदीप जनकल्याण फाउंडेशन
वंशिका फाउंडेशन

या संस्थांच्या माध्यम ातून गरजू व्यक्ती, ज्येष्ठ नागरिक आणि समाजातील विविध घटकांपर्यंत ही मदत पोहोचवली जाणार आहे.

कार्यक्रमात बोलताना डिस्ट्रिक्ट गव्हर्नर श्रेयस दीक्षित यांनी लायन्स क्लबच्या या उपक्रमाचे कौतुक केले आणि नागरिकांना सेवाभावी कार्यात सहभागी होण्याचे आवाहन केले.

अध्यक्षा सुजाता कारखानीस म्हणाल्या, पूर्वजांचे स्मरण करताना त्यांच्या नावाने गरजू व्यक्तींना मदत करणे, ही कृतज्ञता व्यक्त करण्याची एक सुंदर पद्धत आहे. या उपक्रमाद्वारे दान, सेवा आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश समाजापर्यंत पोहोचवण्याचा आमचा प्रयत्न आहे.

**१० ऑक्टोबरपर्यंत चालणार दानसंकलन**

या दानोत्सवातील दानसंकलनाचा पहिला टप्पा १० ऑक्टोबर २०२६ पर्यंत सुरू राहणार आहे. नागरिकांनी सढळ हस्ते दान करून या उपक्रमात सहभाग नोंदवावा, असे आवाहन लायन्स क्लब ऑफ पुणे अशोकनगर गोल्डतर्फे करण्यात आले आहे.

'सेवा हीच खरी श्रद्धांजली' या भावनेतून नागरिकांचे छोटेसे योगदानही गरजूंच्या आयुष्यात मोठा बदल घडवू शकते, हाच या दानोत्सवाचा संकल्प आहे.

या उद्घाटनास क्लबचे चार्टर प्रेसिडेंट वसंत धांडे, अध्यक्षा सुजाता कारखानीस, सचिव ला. पूजा कुलकर्णी, खजिनदार लुब्धा बिद्री, संयोजक महेश कुलकर्णी, पास्ट झेडसी सतीश सांडभोर व तुषार झाड, पीआरओ निलेश तरवडे, रिजन चेअरपर्सन सलील कारखानीस, झोन चेअरपर्सन पराग पाटील, व्हिजिटिंग झोन चेअरपर्सननंदा पंडित व नितीन थोपटे आणि डेप्युटी कॅबिनेट सेक्रेटरी विपिन शेठ आदी मान्यवर उपस्थित होते.

# पाणीटंचाईच्या काळात अंकुशराव रोकडे पाटील फाउंडेशनचा मदतीचा हात...

## रायतळेगावात मोफत पाणीपुरवठा




**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.०१, सुपा (अहिल्यानगर) :** गावात पाणीटंचाईची परिस्थिती निम ाण झाल्याने नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. अशा परिस्थितीत अंकुशराव रोकडे पाटील फाउंडेशन तर्फे रायतळेगावातील महादेव वस्ती आणि तुकाई वस्ती येथे मोफत पाणीपुरवठा करण्यात येत आहे. शासकीय पाणीपुरवठ्याची किंवा टँकरची वाट न पाहता फाउंडेशनने पुढाकार घेत नागरिकांना पिण्याचे पाणी उपलब्ध करून दिल्याने ग्रामस्थांना मोठा दिलासा मिळाला आहे. पाणीटंचाईच्या काळात सामाजिक बांधिलकी जपत करण्यात येत असलेल्या या उपक्रमाचे ग्रामस्थांकडून कौतुक होत आहे.

पिण्याच्या पाण्यासाठी नागरिकांची होणारी गैरसोय लक्षात घेऊन फाउंडेशनने घेतलेल्या या पुढाकाराबद्दल ग्रामस्थांनी अंकुशराव रोकडे पाटील फाउंडेशनचे आभार व्यक्त केले आहेत.


**मे.श्री. एम.आर.जाधव न्यायालय, जिल्हा न्यायाधीश -२५ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, पुणे**

**आरोपीस पेपर जाहीर नोटीस**

(u/s-356 of BNNS act.)

सेशन केस नं. ३७४ / २०१७
लोणीकंद पो.स्टे. गु.र.नं. ५/२०१४
भादंवि कलम - ३२८,१७९,१८८,२७३
अन्न सुरक्षा व मानदे कायदा - २६/२/४,५८,५९

महाराष्ट्र सरकार (लोणीकंद पोलिस स्टेशन)
विरुध्द
नरेंद्रकुमार रमेशचंद श्रीचोडुराम - आरोपी
रा.गल्ली नं.५, साई सत्यम पार्क, पुणे-नगर हायवे, वाघोली, ता. हवेली, जि.पुणे
मुळ रा. अे/६०, संजय कॉलनी, पाटियाला, जालिंदर रोड, पाटियाला, ता.जि. पाटियाला, राज्य पंजाब

ज्या अर्थी महाराष्ट्र सरकार (लोणीकंद पोलिस स्टेशन) तर्फे यांनी या न्यायालयाकडे सेशन केस नं.३७४/२०१७ दाखल केलेले आहे. सदरील प्रकरणामध्ये आरोपी हा अनेक दिवसांपासुन गैरहजर असल्यामुळे सदर प्रलंबित आहे. तरी सदरील आरोपी विरुध्द पेपर जाहीर नोटीस प्रसिध्द होताच तात्काळ न्यायालयात हजर होण्याबाबत ही जाहीर नोटीस प्रसिध्द करण्यात येत आहे. सदरील प्रकरणांची पुढील तारीख १२/१०/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता या न्यायालयात व्यक्तीगत किंवा रीतसर निर्दिष्ट केलेल्या वकीलांमार्फत हजर व्हावे. तसे न केल्यास उक्त प्रकरणांचा एकतर्फा सुनावणी होउन निर्णय दिला जाईल. दिनांक ०७/०९/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

हुकुमावरुन,

शिक्का

**अधिक्षक,**
जिल्हा न्यायालय, पुणे



**मे.श्री. एम.आर.जाधव न्यायालय, जिल्हा न्यायाधीश -२५ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, पुणे**

**आरोपीस पेपर जाहीर नोटीस**

(u/s-356 of BNNS act.)

सेशन केस नं. २५२/२०१७
लोणीकंद पो.स्टे. गु.र.नं. २८३/२०१४
भादंवि कलम - ३२८,
मुं.प्रोव्ही. कायदा - ६५,ख,ड

महाराष्ट्र सरकार (लोणीकंद पोलिस स्टेशन)
विरुध्द
अंदु उर्फ मंजु राजु रजपुत - आरोपी
रा. पेरणे फाटा झोपडपट्टी, ता. हवेली, जि.पुणे

ज्या अर्थी महाराष्ट्र सरकार (लोणीकंद पोलिस स्टेशन) तर्फे यांनी या न्यायालयाकडे सेशन केस नं.२५२/२०१७ हे दाखल केलेले आहे. सदरील प्रकरणामध्ये आरोपी हा अनेक दिवसांपासुन गैरहजर असल्यामुळे सदर प्रलंबित आहे. तरी सदरील आरोपी विरुध्द पेपर जाहीर नोटीस प्रसिध्द होताच तात्काळ न्यायालयात हजर होण्याबाबत ही जाहीर नोटीस प्रसिध्द करण्यात येत आहे. सदरील प्रकरणांची पुढील तारीख १२/१०/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता या न्यायालयात व्यक्तीगत किंवा रीतसर निर्दिष्ट केलेल्या वकीलांमार्फत हजर व्हावे. तसे न केल्यास उक्त प्रकरणांचा एकतर्फ सुनावणी होउन निर्णय दिला जाईल. दिनांक ०७/०९/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

हुकुमावरुन,

**अधिक्षक,**
जिल्हा न्यायालय, पुणे


# हर घर जल गावात 'जल अर्पण'; आज कार्यक्रमाचे आयोजन

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०१, चंद्रपूर :** जल जीवन मिशन अंतर्गत गावातील पाणीपुरवठा येजनांचे औपचारिक हस्तांतरण ग्रामसमुदायाकडे करण्याच्या उद्देशाने राज्य पाणीपुरवठा व स्वच्छता वीभाग यांच्या मार्गदर्शक सूचनांनुसार २ ऑक्टोबर रोजी ' जल अर्पण दिवस' साजरा करण्यात येणार आहे.

हर घर जल
जल जीवन मिशन

जिल्ह्यात 'हर घर जल' घोषित झालेल्या गावांमध्ये ज्या गावातील पाणीपुरवठा सुरळीत सुरु आहे, पाणीपुरवठा योजना पूर्ण झालेल्या आहेत, अशा गावांमध्ये ' जल अर्पण' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. ग्रामपंचायत व ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समितीच्या माध्यमातून पाणीपुरवठा योजनेची प्रत्यक्ष पाहणी व तपासणी करण्यात येणार आहे. ग्रामसभेतून पाणीपुरवठा योजनेबाबत तसेच पाणी गुणवत्ता याबाबत जनजागृती करण्यात येणार आहे. ' जल अर्पण' कार्यक्रमाच्या दिवशी ग्रामसभेमध्ये ग्रामस्थांना पाणीपुरवठा योजना, तिचे हस्तांतरण तसेच योजनेच्या देखभाल व दुरुस्तीबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

कार्यक्रमात महिला बचत गट, युवक, आशा सेविका, अंगणवाडी सेविका, शिक्षक, ग्रामस्थ, भजनी मंडळे आणि लोकप्रतिनिधी यांचा सक्रीय सहभाग घेण्यात येणार आहे. सकाळी प्रभातफेरीचे आयोजन केले जाणार आहे. ' जल अर्पण' कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे पाणीपुरवठा योजनेच्या पाण्याच्या टाकीला 'जल बंधन' करण्यात येणार आहे. यामधून आजपासून ही पाणीपुरवठा योजना गावाची असून, तिची देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी गावाची राहील असा संदेश पाणीपुरवठा विभागातर्फे ग्रामस्थांना देण्यात येणार आहे. गावातील पाणीपुरवठा येजना केवळ शासनाची मालमत्ता न राहता ग्रामसमुदायाच्या सहभागातून तिचे योग्य व्यवस्थापन, देखभाल व संवर्धन व्हावे, हा उद्देश आहे.